# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

१५ मे, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)

## ऑनलाईन फ्राडमधील रक्कम फिर्यादीचे खात्यामध्ये परत
## १ लाख ४० हजार रु. रिफन्ड करण्यामध्ये चंद्रपुर सायबर सेलला यश...

सध्या इंटरनेटचे युग असुन प्रत्येक नागरीक दैनंदिन जीवनामध्ये ईंटरनेट व मोबाईलचा खुप मोठया प्रमाणामध्ये उपयोग करीत आहे. परंतू, इंटरनेट/मोबाईचा वापर करताना दक्षता न घेतल्याने सायबर गुन्हे घडत असल्याचे दिसुन आले आहे. दिनांक ०७ मे २०२० रोजी सास्ती, राजुरा येथील एका व्यक्तीस फोन आला की, तुमचे सिमकार्ड अपग्रेड करायचे का? सदर व्यक्तीने त्यास होकार दिल्याने त्या व्यक्तीस काही एसएमएस प्राप्त होवुन नंतर त्याचे सिमकार्ड एक दिवसाकरीता बंद झाले. सदर व्यक्तीचे बंद झालेले सिमकार्ड हे त्याचे आयसिआसिआय बॅक खात्यासोबत जोडलेले असल्याने फसवणुक करणारे अज्ञात आरोपीने फिर्यादी याचे मोबाईल नंबरचा उपयोग करुन त्याचे बॅक खात्यातील एकुण १ लाख ४० रुपये काढुन घेतले. फिर्यादी यांनी ताबोडतोब बॅकेला व सायबर सेल, चंद्रपुर येथे येवुन सविस्तर माहीती देवुन पोस्टे राजुरा येथे तक्रार दिल्याने अप.क्रं.२८७/२०२० कलम ४२० भादंवि कलम ६६ ड आयटी अॅक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. त्यावरुन सायबर सेल, चंद्रपुर येथुन तात्काळ सबंधित बॅकेसोबत सपंर्क करुन तांत्रीक मुद्दयावर तपास केला. सायबर सेल येथील पोलीसांनी दाखविलेल्या कर्तव्यतत्परतेमुळे फिर्यादीसोबत फसवणुक करुन बॅक खात्यामधुन काढण्यात आलेली रक्कम १ लाख ४० रुपये काल दिनांक १३ मे २०२० रोजी फिर्यादी यांचे बॅक खात्यामध्ये रिफन्ड झाली आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक, चंद्रपुर यांचे मार्गदर्शनाखाली सायबर सेल, चंद्रपुर येथील अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे. चंद्रपुर पोलीसांकडुन वेळोवेळी सायबर क्राईम जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. मोबाईल फोनवर कोणत्याही अज्ञात व्यक्तीला बॅक खाते किंवा वैयक्तीक माहीती शेअर करु नये तसेच ऑनलाईन व्यवहार करताना संपुर्ण दक्षता घेण्याचे आवाहन पोलीसविभागातर्फे करण्यात येत आहे.